**खरेदी विभाग**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

**विषय- गाईचे शुध्द तूप खरेदी २०२२-२३ ऑनलाईन चालू असलेले**

**ई-निविदा क्रं-2022_SAI_808171_1 मधील अटी/शर्तीमध्ये सुधारणा केलेबाबत...**

# शुध्दीपत्रक

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकडून सन २०२२-२३ वर्षासाठी गाईचे शुध्द तूप खरेदीसाठी शुध्द तूपाचे उत्पादकांकडून दि.१५.०६.२०२२ ते ०६.०७.२०२२ या कालावधीत ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आल्या आहेत.

सदर ई-निविदेतील B, D व J मध्ये खालीलप्रमाणे अटी-शर्ती नमूद केल्या होत्या. त्यामध्ये सुधारणा करून नवीन सुधारीत अटी गडद व अधोरेखित केलेल्या आहेत.

**B. ई-निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे, आर्थिक उलाढालीचे निकष वगैरे तपशील खालीलप्रमाणे-**

*निविदेतील अट-५.* ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या फर्मची सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या ३ आर्थिक वर्षांची किमान वार्षिक सरासरी उलाढाल रक्कम रू. १०० कोटी असणे अनिवार्य राहील. तसे उलाढाल नमुद असणारे व निविदेसोबत दिलेल्या नमुन्याप्रमाणे सी.ए यांचे प्रमाणपत्र ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

*सुधारीत अट-* **ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या फर्मची सन २०१८-१९,२०१९-२० व २०२०-२१ या ३ आर्थिक वर्षांची किमान वार्षिक सरासरी उलाढाल रक्कम रू. १०० कोटी असणे अनिवार्य राहील. तसे उलाढाल नमुद असणारे व निविदेसोबत दिलेल्या नमुन्याप्रमाणे सी.ए यांचे प्रमाणपत्र ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.**

**D. पुरवठा करावयाच्या शुध्द तूपाचा तपशिल, निविदा फी व बयाणा रक्कम-**

*निविदेतील अट-१.* पुरवठा करावयाचे शुध्द तूपाचा तपशिल BOQ मध्ये दिलेला आहे. ऑगस्ट-२०२२ ते ऑक्टोंबर २०२२, नोव्हेंबर २०२२ ते जानेवारी २०२३, फेब्रुवारी २०२३ ते एप्रिल २०२३ व मे २०२३ ते जुलै २०२३ अशा प्रत्येक तीन महिन्याचे कालावधीत शुध्द तूप पुरविणेसाठी BOQ चे चार भाग करण्यात आले आहेत. निविदाधारक कुठल्याही १/२/३ किंवा ४ भागासाठी किंवा ४ ही भागांसाठी निविदा सादर करू शकतो. तथापि निविदा फी व बयाणा रक्कम खाली नमूद केलेप्रमाणेच राहिल. निविदा प्रक्रियेत भाग घेणेसाठी ऑनलाईन BOQ मध्ये दर भरावे लागतील.

*सुधारीत अट-*

***पुरवठा करावयाचे शुध्द तूप ८५०० क्विंटल असून सदर ई-निविदेचे BOQ चे चारही भागापैकी कुठल्याही एका भागात प्रती क्विंटलचे वार्षिक दर भरावेत. तोच दर विचारात घेतला जाईल.***

*निविदेतील अट-२.* प्रत्येक भागाचे कालावधीसाठी BOQ मध्ये भरलेल्या दरांचा तुलनात्मकदृष्ट्या स्वतंत्रपणे विचार करण्यात येईल.

*सुधारीत अट-*

***वरील चार भागांपैकी कुठल्याही एका भागात ऑनलाईन भरलेले दर हे वार्षिक दर आहेत हे ग्राहय धरण्यात येईल.***

*निविदेतील अट-३.* प्रत्येक भागामध्ये भरलेले दरांचा विचार करून अंतीम निर्णय घेण्यात आलेनंतर त्यातील दरानुसार त्या-त्या कालावधीतील अगर प्रायोगिक तत्वावर पुरवठा आदेश देणेबाबत निर्णय घेण्यात येईल. त्याप्रमाणे करारनामा व पुरवठा आदेश रक्मेच्या ३ टक्के सुरक्षा अनामत रक्कम त्वरीत भरावी लागेल.

*सुधारीत अट-*

***वरील चार भागांपैकी कुठल्याही एका भागात भरलेल्या वार्षिक दरांचा विचार करून पुरवठा आदेश देणेबाबत निर्णय घेण्यात येईल. त्याप्रमाणे करारनामा व पुरवठा आदेश रकमेच्या ३% सुरक्षा अनामत रक्कम त्वरीत भरावी लागेल.***

Scanned with CamScanner

**J. शुध्द तूपाचा पुरवठा करण्याची मुदत व पुरवठा आदेश देण्याची पध्दत –**

निविदेतील अट १. शुध्द तूपाचा पुरवठा करण्याचा कालावधी ऑगस्ट २०२२ ते ऑक्टोबर २०२२, नोव्हेंबर २०२२ ते जानेवारी २०२३, फेब्रुवारी २०२३ ते एप्रिल २०२३ व मे २०२३ ते जुलै २०२३ असा राहिल.

***सुधारीत अट-***

***शुध्द तूपाचा पुरवठा कालावधी ऑगस्ट २०२२ ते जुलै २०२३ असा राहील.***

निविदेतील अट ४. चारही टप्प्यांची निविदा एकाच निविदाधारकास मंजूर झाल्यास निविदा कालावधीत अगर त्यानंतरही पुढील खरेदी संबंधीत प्रक्रिया पुर्ण होईपावेतो श्री साईबाबा संस्थानला तूपाची गरज असल्यास आवश्यकतेनुसार मंजूर केलेल्या परिमाणापेक्षा २५ टक्केपर्यंत जादा तूपाचा पुरवठा मंजूर दराने करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील.

***सुधारीत अट-***

***पुरवठा आदेश दिलेनंतर सदर पुरवठादारास पुरवठा कालावधीत अगर त्यानंतरही पुढील खरेदी संबंधीत प्रक्रिया पुर्ण होईपावेतो श्री साईबाबा संस्थानला तूपाची गरज असल्यास आवश्यकतेनुसार मंजूर केलेल्या परिमाणापेक्षा २५ टक्केपर्यंत जादा तूपाचा पुरवठा मंजूर दराने करणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.***

निविदेतील अट-७. एकच निविदाधारक निविदेत नमूद चारही तिमाही कालावधीसाठी न्युनतम दरधारक ठरला तरीही प्रत्येक तिमाही कालावधीचा पुरवठा आदेश, करारनामा स्वतंत्र करण्यात येईल. यामध्ये पहिल्या तिमाहीमध्ये पुरविलेले तूपाचा व दिलेल्या सेवेचा दर्जा विचारात घेऊन पुढील तिमाहीसाठी पुरवठा आदेश देणेबाबत विचार केला जाईल.

***सदर अट रद्द करण्यात येत आहे.***

निविदेतील अट-८. चारही टप्प्यांमध्ये स्वतंत्र न्युनतम दरधारक असल्यास चारही न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश व्हेंडर ऑडिटचा अहवाल सकारात्मक असलेस लगेच देणेत येतील. त्यानुसार संबंधित पुरवठाधारकांनी ३ टक्के सुरक्षा अनामत रक्कम श्री साईबाबा संस्थानकडे त्वरीत भरणे व श्री साईबाबा संस्थानला करारनामा करून देणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.

***सदर अट रद्द करण्यात येत आहे.***

**निविदाधारकांनी सुधारीत अटी विचारात घेऊन निविदा भरावी.**

(भाग्यश्री बानायत, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

Scanned with CamScanner